महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग,
दालन क्रमांक ७१५, मंत्रालय, विस्तार,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२
ईमेल: desk३.mdd-mh@mah.gov.in दुरध्वनी क्रमांक ०२२ २२८३०६२६

क्र. अविवि-२०२५/प्र.क्र.५९/का-३ **दिनांक :-२६ नोव्हेंबर २०२६**

प्रति,
पुरवठादार

विषय :- अल्पसंख्याक विकास विभाग (खुद्द) विभागासाठी लेखनसामग्री/स्टेशनरी खरेदी करण्यासाठी पुरवठादार निश्चित करण्याबाबत.

अल्पसंख्याक विकास विभाग (खुद्द) मधील कार्यासनांसाठी लेखनसामुग्री/स्टेशनरी, संगणक साहित्य व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी १ वर्षाच्या कालावधीकरिता वार्षिक दरकरार करावयाचा आहे. त्यानुषंगाने, सोबतच्या यादीतील वस्तूंचे दर/किंमत सादर करण्याची आपणांस विनंती आहे.

२. सदर दरपत्रके कक्ष अधिकारी, नोंदणी शाखा कक्ष, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, विस्तार,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२ या ठिकाणी स्वतः अथवा पोस्टाने दि.०२.१२.२०२६ रोजी सकाळी १२:०० वाजेपर्यंत सादर करण्यात यावीत. सदर दरपत्रके उप सचिव, कार्यासन ३, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, विस्तार इमारत,मादामकामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२ या ठिकाणी दि. ०२.१२.२०२६ रोजी दुपारी ४:०० वाजता उघडण्यात येतील. दरपत्रके उघडतेवेळी आपण स्वतः किंवा आपल्या संस्थेचा एक प्रतिनिधी उपस्थित राहू शकतो. प्राप्त दरपत्रके स्विकारणे, कोणतेही कारण न देता नाकारण्याचे व दरपत्रके प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांनी राखून ठेवलेले आहेत. खालील कागदपत्रे स्वतंत्र लिफाफ्यात (दरपत्रक लिफाफ्या व्यतिरिक्त) सादर करणे आवश्यक आहे.

१) उद्योग आधार नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र.

२) GST प्रमाणपत्र.

३) दरपत्रककार संस्था/विक्रेत्याचे पॅनकार्ड.

४) मागील ३ वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाणपत्र.

३. तसेच दरपत्रक प्राप्त झाल्यानंतर विभागाने दर मान्य केल्यास, अटी व शर्तीच्या अधिन राहून संस्थेची नियुक्ती करण्यात येईल.

(आनंदा शेंडगे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

निवडनस्ती (का.३)